मार्गदर्शन

# रेशीम कीटकांचे थंडीपासून असे करा संरक्षण




प्रा. बाबासाहेब बोबडे
(मो. ८३०८६१९०६१)
डॉ. विजय धुळगंड
प्रा. राहुल साळवे
सहायक प्राध्यापक,
आदित्य कृषी महाविद्यालय, बीड






सध्या जानेवारी महिन्यात वाढलेल्या थंडीच्या तीव्रतेमध्ये संगोपनगृहातील वातावरण उष्ण ठेवण्यासाठी इलेक्ट्रिक शेगडी, कोळशाची शेगडी किंवा सच्छिद्र मातीचे माठ (ज्यात २ किलो कोळसा बसेल) असे वापरावेत. भारनियमनामुळे इलेक्ट्रिक शेगडी वापरण्यास अडचणी येतात, त्यामुळे स्वस्तातील तंत्र म्हणून मातीचे माठ वापरावेत. संगोपनगृहाबाहेर माठात कोळसे भरून पेटवून धूर कमी झाल्यानंतर संगोपनगृहात झाकणीने झाकून ठेवावेत.

सध्या थंडीमध्ये वाढ होत असून त्याचा परिणाम रेशीम कीटकांच्या विविध वाढीच्या अवस्थांवर होऊ शकतो. त्यामुळे रेशीम कीटकांच्या विविध वाढींच्या अवस्थांत लागणारे तापमान जाणून ते संतुलित ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रयत्न करावेत.

रेशीम कीटक संगोपनगृहातील तापमान व सापेक्ष आर्द्रता यांचे समायोजन करणे खूप गरजेचे असते. बाल्यावस्थेतील कीटक संगोपन काळात संगोपनगृहातील सरासरी तापमान २६ ते २८ अंश सेल्सिअस आणि प्रौढ संगोपन काळात २४ ते २५ अंश सेल्सिअस व सापेक्ष आर्द्रता ८४ ते ८८ टक्के ठेवल्यास रेशीम कीटकांची वाढ चांगली होते. यासाठी रेशीम कीटक संगोपनगृहात तापमान मोजण्यासाठी तापमापी आणि आर्द्रता मोजण्यासाठी हायग्रोमीटरचा वापर करावा.

सध्या जानेवारी महिन्यात वाढलेल्या थंडीच्या तीव्रतेमध्ये संगोपनगृहातील वातावरण उष्ण ठेवण्यासाठी इलेक्ट्रिक शेगडी, कोळशाची शेगडी किंवा सच्छिद्र मातीचे माठ (ज्यात २ किलो कोळसा बसेल) असे वापरावेत. भारनियमनामुळे इलेक्ट्रिक शेगडी वापरण्यास अडचणी येतात, त्यामुळे स्वस्तातील तंत्र म्हणून मातीचे माठ वापरावेत. संगोपनगृहाबाहेर माठात कोळसे भरून पेटवून धूर कमी झाल्यानंतर संगोपनगृहात झाकणीने झाकून ठेवावेत. संगोपनगृहाच्या आकारानुसार ८ ते १० तास माठ संगोपनगृहात ठेवावेत. सध्या संगोपनगृहात रात्रीचे तापमान हे १३ ते १४ अंशापर्यंत खाली आले तर त्यात १० ते १२ अंश सेल्सिअसने वाढ करण्याची गरज असते.

तसेच संगोपनगृहातील आर्द्रता संतुलित ठेवण्यासाठी आपण डेझर्ट कूलरचा वापर करू शकतो किंवा खिडक्यांना गोणपाटाचे आच्छादन करून त्यावर पाणी मारून आर्द्रता वाढविता येते.

### बाल्यावस्थेतील कीटक संगोपनगृहात घ्यावयाची काळजी

* संगोपनगृह व संगोपन साहित्याचे पूर्णतः निर्जंतुकीकरण करणे आवश्यक आहे.

* अंडीपुंजांची वाहतूक सकाळी किंवा सायंकाळी बाष्पयुक्त (फोम कोटेड) पिशवीतून करावी.

* अंडी उबवण काळात संगोपनगृहात २५ अंश सेल्सिअस तापमान व ७५ ते ८० टक्के आर्द्रता संतुलित असावी. * दुसऱ्या अवस्थेपर्यंत संगोपनगृहात २७ ते २८ अंश सेल्सिअस तापमान व ८० ते ८५ टक्के आर्द्रता ठेवावी.

* बाल्यावस्थेतील रेशीम कीटकांना उच प्रतीची ८० टक्के आर्द्रता असलेली कोवळी तुतीची पाने खाद्य म्हणून द्यावीत. * प्रत्येक दिवशी संगोपन ट्रेमध्ये रेशीम कीटकांमध्ये आवश्यक तेवढे अंतर ठेवावे. * कोष काढणीनंतर दोन पिकांत ८ दिवसांचा खंड ठेवणे आवश्यक आहे. या काळात संपूर्ण संगोपनगृह व साहित्य निर्जंतुक करून घ्यावे व कडक उन्हात वाळवून घ्यावे. * संगोपनगृहात प्रवेश करतेवेळी पादत्राणे बाहेर ठेवून हात १ टक्का ब्लिचिंग पावडरमध्ये धुवून आत जावे. * कीटक संगोपनगृहात आत/बाहेर ५ टक्के ब्लिचिंग पावडरसोबत चुन्याची निवळी मिसळून (१:१९ या प्रमाणात) २०० ग्रॅम प्रति चौरस मीटर याप्रमाणे ५ दिवसांच्या अंतराने शिंपडत राहावे. * रोगट व मृत रेशीम कीटक प्लॅस्टिकच्या घमेल्यात ५ टक्के ब्लिचिंग पावडरच्या द्रावणात निवडून घेऊन टाकावेत व संगोपनगृहापासून लांब अंतरावर जमिनीत पुरून टाकावे. * प्रत्येक दिवशी संगोपन ट्रे स्वच्छतेनंतर २ टक्के ब्लिचिंग पावडरची जमिनीवर शिंपडणी करावी किंवा फरशी स्वच्छ पुसून घ्यावी. * चौथी कात अवस्था पूर्ण केलेल्या रेशीम कीटकांना संगोपन टॅकमध्ये व्यवस्थित सारख्या प्रमाणात दररोज तीन वेळा फांद्यांचे खाद्य द्यावे. ■

**रेशीम कीटकांच्या वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थांमधील आवश्यक तापमान व आर्द्रता**

| वाढीची अवस्था | तापमान अंश. से. | आर्द्रता (टक्के) | १०० अंडीपुंजांसाठी तुती पाने (कि. ग्रॅ.) | संगोपन ट्रेंची संख्या (२ x ३ फूट आकाराचे) |
|---|---|---|---|---|
| पहिली | २६ ते २८ | ८४ ते ८८ | ३ ते ३.५० | ४ |
| दुसरी | २६ | ८४ | ८ ते १० | ८ |
| तिसरी | २५ ते २६ | ८० | ४५ ते ५० | १० ते १५ |
| चौथी | २३ ते २४ | ७५ ते८० | १०० ते १२५ | १६ ते ३० |
| पाचवी | २४ | ६५ ते ७५ | ५०० ते १००० | ४० ते ५० |